प्रस्तुत प्रकरणात आजरोजी सुनावणी मध्ये झालेला युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी आदेशित केलेले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याने विचाराधीन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./७६३व ७६४/२०२४ 7460 दि. 07/02/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. २५ व २६ | द्वितीय अपील क्रं. ७६५ व ७६६/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अजिज फझल सय्यद,<br>रा. मोहम्मद पनाह गल्ली नळदुर्ग ता. तुळजापुर जि. धाराशिव | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,<br>ज्ञानदीप विद्यालय सलगरा (मड्डी) ता. तुळजापूर जि. धाराशिव | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी माध्यमिक<br>जिल्हा परिषद, धाराशिव | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २३.१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी (प्रतिनिधी) उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २९.८.२०२३ | शासनाकडुन मिळालेल्या सर्व प्रकारची अनुदाने याची माहिती मिळणे बाबत. |
| २९.८.२०२३ | शाळेतील शालेय पोषण आहर संदर्भातील माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक ३०.१०.२०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात आजरोजी सुनावणी मध्ये झालेला युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी आदेशित केलेले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याने विचाराधीन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रशाइं

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./७६५व ७६६/२०२४ 7461 दि. 07/07/2025

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

| |
|---|
| राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,<br>बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या<br>पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ |

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. २७ | द्वितीय अपील क्रं. ७६७/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अजिज फझल सय्यद,<br>रा. मोहम्मद पनाह गल्ली नळदुर्ग ता. तुळजापुर जि. धाराशिव | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,<br>जि. प. कें. प्रा. शा. नळदुर्ग ता. तुळजापुर जि. धाराशिव | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा केंद्रप्रमुख<br>केंद्र नळदुर्ग ता. तुळजापुर जिल्हा परिषद, धाराशिव | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २३.१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २८.८.२०२३ | शाळेतील शालेय पोषण आहर संदर्भातील माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण दिलेली असल्याने जन माहिती अधिकारी यांना दंड करावा व मला नुकसान भरपाई देण्यात यावी.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपुर्ण माहिती अपिलार्थी यांना दिनांक २६.९.२०२३ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलली आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६.९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याने विचाराधीन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./७६७/२०२४ 7462 दि. 07/07/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. २८ ते ३० | द्वितीय अपील क्रं. ७६८ ते ७७०/२०२४ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अजिज फझल सय्यद,<br>रा. मोहम्मद पनाह गल्ली नळदुर्ग ता. तुळजापुर जि. धाराशिव | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,<br>जि. प. कन्या प्रशाला नळदुर्ग ता. तुळजापुर जि. धाराशिव | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी<br>गट शिक्षणधिकारी कार्यालय, तुळजापुर जिल्हा धाराशिव | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २३.१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २८.८.२०२३ | शासनाकडुन मिळालेल्या सर्व प्रकारची अनुदाने याची माहिती मिळणे बाबत. |
| २८.८.२०२३ | शाळेतील पोषण आहर संदर्भातील माहिती |
| २८.८.२०२३ | शासनाकडुन मिळालेल्या सर्व प्रकारची अनुदाने याची माहिती मिळणे बाबत. |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण व दिशाभुल करणारी दिलेली असल्याने जन माहिती अधिकारी यांना दंड करावा व मला नुकसान भरपाई देण्यात यावी.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपुर्ण माहिती अपिलार्थी यांना दिनांक २५.९.२०२३ रोजीच्या उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्याने अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५.९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याने विचाराधीन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त ०३ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./७६८ ते ७७०/२०२४ 7463 दि. 07/07/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ३१ व ३२ | द्वितीय अपील क्रं. १८३१ व १८४२/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सुनिल दत्तात्रय गायकवाड,<br>रा. तोरणा कामधेनु सोसायटी प्लॉट नं. डी-२<br>पुणे सोलापूर रोड हडपसर, पुणे- ४११०२८ | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,<br>शिक्षण विभाग, प्राथमिक, जिल्हा परिषद, धाराशिव | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी प्राथमिक<br>जिल्हा परिषद, धाराशिव | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ११.३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १८.१२.२०२३ | १. ऑक्टो. २०२२ ते नोव्हे. २०२२ मधील वेतन देयका बाबत.<br>२. माझे नोव्हेंबर २०२२ चे वेतन रोखले बाबत. |

आज रोजी अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहेत. मात्र त्यांनी आयोगात सादर केलेल्या द्वितीय अपीलाच्या प्रयोजनामध्ये माहिती मिळाली नाही अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही, असे नमुद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, शिक्षण विभाग, प्राथमिक, जिल्हा परिषद, धाराशिव यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्य कार्यकारी अधिकारीजिल्हा परिषद, धाराशिव यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१८३१ व १८४२/२०२४ 7464 दि. 07/07/2020

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, धाराशिव

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ३३ | द्वितीय अपील क्रं. ६०८८/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्रीमती सोनाली राजकुमार मते<br>रा. शिगोली पो. वाघोली ता. कळंब जि. धाराशिव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,<br>जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंगोली ता. कळंब जि. धाराशिव | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी<br>पंचायत समिती कळंब जि. धाराशिव | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दिनांक ०३.६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २२.१२.२०२३ | शाळा क्रिडागंण सपाटीकरण अंतर्गत केलेल्या कामाचा तपशील |

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. १६.१.२०२४ रोजी प्रतिसाद देऊन माहिती उपलब्ध करुन दिलेल आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान दिलेल्या निर्देशानुसार जन माहिती अधिकारी यांनी ५ मुद्याची माहिती दि.५.५.२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये व्यापक स्वरुपाची माहिती मागविलेली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती मध्ये आयोगास कोणतेही जनहित दिसुन येत नसल्याने अपिलार्थी यांचे अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६०८८/२०२४ 7465 दि. 07/07/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ३४ | द्वितीय अपील क्रं. ६३३०/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. काश्यप तानाजी बनसोडे,<br>रा. शाहुनगर काकडे प्लॉट धाराशिव | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक गट-ब,<br>शिक्षण विभाग प्राथमिक, जिल्हा परिषद, धाराशिव | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी प्राथमिक<br>जिल्हा परिषद, धाराशिव | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १४.६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०८.१२.२०२३ | श्री. बालाजी किसनराव यरमुनवाड यांच्या जातवैधता प्रमाणपत्राची सत्यप्रत |

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. १६.१.२०२४ रोजी प्रतिसाद देऊन मागणी केलेली माहिती वैयक्तीक स्वरुपाची असल्याने कलम ८ (त्र) अन्वये अपिलार्थी यांना माहिती नाकारलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि. १८.४.२०२४ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की अपिलार्थी यांनी त्रयस्थ व्यक्तीच्या संदर्भातील वैयक्तिक स्वरुपाची माहिती मागितली आहे. मागितलेल्या माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित दिसून येत नसल्यामूळे अशी माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१)(ञ) व शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १७.१०.२०१४ विचारात घेता, माहिती देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६३३०/२०२४ 7486 दि. 07/07/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ३५ व ३६ | द्वितीय अपील क्रं. ६४३३ व ६४३४/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बाळासाहेब वसंतराव सुभेदार<br>रा. छत्रपती संभाजीराजे कॉलनी, जाधववाडी रोड, ता. जि. धाराशिव | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक<br>जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा दाऊतपुर ता. जि. धाराशिव | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी<br>पंचायत समिती धाराशिव | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २०.६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| अपील क्रमांक | माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|---|
| ६४३३/२०२४ | ०५.२.२०२४ | प्रवेश जनरल रजिस्टच्या प्रमाणित प्रती मिळणे बाबत सन १९६८ |
| ६४३४/२०२४ | ०५.२.२०२४ | श्री. दशरथ पंढरी ठवरे यांचा प्रवेश निर्गम उतारा मिळणे बाबत. |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारलेली आहे. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाची वैयक्तीक स्वरुपाची असल्याने अपिलार्थी यांना माहिती

नाकारलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक २८.३.२०२४ रोजी सुनावणी घेतलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात आजरोजी आयोगासमोर झालेला युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपील क्रं. ६४३४/२०२४ मध्ये त्रयस्थपक्ष श्री. ठवरे यांनी दि.०८.२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये त्यांची माहिती अपिलार्थीस देण्यास संमती नसल्याचे जन माहिती अधिकारी यांना कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती पुरविता येऊ शकत नसल्याचे अपिलार्थीस कळविलेले आहे. प्रकरणी अपिलार्थी यांनी त्रयस्थ व्यक्तीच्या संदर्भातील वैयक्तिक स्वरुपाची माहिती मागितली आहे. अशी माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१) (ञ) व शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १७.१०.२०१४ विचारात घेता, माहिती देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६४३३ व ६४३४/२०२४/7467 दि. 07/07/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ३८ | द्वितीय अपील क्रं. ८७४०/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सोमनाथ दादाराव डाके<br>रा. तांबरी विभाग बार्शी नाका ता. जि. धाराशिव | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सावित्रीबाई फुले उच्च माध्यमिक विद्यालय सातेफळ ता. कळंब जि. धाराशिव | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक, सावित्रीबाई फुले उच्च माध्यमिक विद्यालय सातेफळ ता. कळंब जि. धाराशिव | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २६.९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २४.७.२०२४ | आपल्या महाविद्यालयात प्राध्यापकपदी दिलेल्या नेमणुकी बाबत. |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्याप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सावित्रीबाई फुले उच्च माध्यमिक विद्यालय सातेफळ ता. कळंब जि. धाराशिव यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (सेवापुस्तिका वगळुन) अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. विभागीय उपसंचालक शिक्षण, लातूर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./८७४०/२०२४/7468 दि. 07/07/2025

<u>प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता</u>

विभागीय उपसंचालक शिक्षण, लातूर

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ३९ | द्वितीय अपील क्रं. ९७०१/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | डॉ. हरिदास जोगदनगर रा. जवाहर कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय अणदुर ता. तुळजापूर जि. धाराशिव | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सचिव, शिक्षण प्रसारक मंडळ,अणदुर ता. तुळजापूर जि. धाराशिव | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मदाय आयुक्त, धर्मदाय आयुक्त कार्यालय, जिल्हा न्यायालय जवळ धाराशिव | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १७.४.२०२४ | अर्जदाराचे प्रलंबित वेतन केव्हा जमा करणार आहात इत्यादी |

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने त्यांना त्यांची बाजु मांडण्याची वाजवी संधी देण्यात येऊनही ते सुनावणी करिता अनुपस्थित आहेत. यावरुन त्यांना आयोगासमोरील सुनावणीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

याप्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये १० मुद्याची मोघमपणे विस्तृत स्वरुपाची माहिती मागविलेली आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित/संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकारणा कडील मनुष्यबळ/साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./९७०१/२०२४ 7469 दि. 07/07/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

| |
|---|
| राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर, बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ |

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ४० | द्वितीय अपील क्रं. ४३७/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. परमेश्वर संभाजी पाटील जाधव<br>रा. मु. वहाद पो. कुरुळा ता. कंधार जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल,<br>सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कंधार ता. नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनिकरण विभाग, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १६.१.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०४.८.२०२२ | आपल्या परिक्षेत्राअंतर्गत स.न. २०२०-२१ या वर्षात कामाच्या साईट, मस्टर इत्यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. मात्र यासंदर्भात अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती आयोगाने निर्देशीत केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी यानात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक ११.११.२०२२ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कंधार ता. नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. विभागीय वनअधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग नांदेड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४३७/२०२३ 7470 दि. 07/07/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ४१ | द्वितीय अपील क्रं. १४०७/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शिवाजी देवराव शिंदे,<br>रा. पाटनुर पो. शेंबोली ता. अर्धापूर जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा कक्ष प्रमुख, लेखाकक्ष,<br>सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनिकरण विभाग, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २७.२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये, द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १८.५.२०२२ | झालेल्या खर्चाचे समरीची छायांकित प्रत इत्यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०.७.२०२२ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकन करणेसाठी दिनांक २.८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. मात्र अपिलार्थी माहितीच्या अवलोकनसाठी कार्यालयात न आल्याने अपिलार्थी यांना माहिती देणे शक्य झाले नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र-अ नुसार विस्तृत स्वरुपाची माहिती मागविली असल्याचे आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष प्रमुख, लेखाकक्ष, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांना आदेशित करण्यात येते की, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणाऱ्या माहितीचे अवलोकन द्यावे. अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. विभागीय वनअधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग नांदेड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

सत्यमेव जयते

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१४०७/२०२३ 7471 दि. 07/07/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| श्री. घोनशेटवाड गणेश बापुराव<br>रा. मु. पो. कोलंबी ता. नायगाख खै. जि. नांदेड | अपिलार्थी |

विरुध्द

| सुनावणी बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 42, 44, 45, 46, 47, 48 | 2916, 2918, 2919, 2920, 3307, 3308 /2023 | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल , सामाजिक वनीकरण परिक्षेत्र नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

| सुनावणी बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 43 | 2917/2023 | जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उप वनसंरक्षक वनविभाग, नांदेड यांचे कार्यालय | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, (रोहयो व वन्यजीव) वनविभाग, नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

( सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये ०७ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| अपील क्रं. | माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|---|
| २९१६/२०२३ | १५.२.२०२३ | चालू असलेल्या एकुण २९४ कामाची माहिती |
| २९१८/२०२३ | ०९.२.२०२३ | जावक व दौरा रजिस्टरची प्रत |
| २९१९/२०२३ | ०९.२.२०२३ | जावक व दौरा रजिस्टरची प्रत |

| | | |
|---|---|---|
| २९२०/२०२३ | १०.१.२०२३ | नमुना नं. ३२ ची प्रत |
| ३३०७/२०२३ | २७.१.२०२३ | सन २०१७ ते २०२२ कालावधीच्या मोजमाप पुस्तिका व कॅशबुक |
| ३३०८/२०२३ | २७.१.२०२३ | सन २०१७ ते २०२२ कालावधीच्या नमुना नं. ३२ ची प्रत |
| २९१७/२०२३ | २१.१२.२०२२ | ५० ठिकाणी गटलागवड केलेल्या मोजमाप पुस्तिका, व्हॉऊचर इत्यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद देऊन माहिती व माहिती संदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला आहे. मात्र माहिती उपलब्ध करुन दिलेली असतानाही आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करतात अर्जदाराच्या अशा भुमिकेचा दैनंदिन कामकाजावर विपरित परिणाम होऊन कार्यालयाचे कामकाज प्रलंबित राहत आहे. तरी अपिलार्थी यांचे सर्व विचाराधीन अपील निकाली काढण्यात यावेत ही विनंती.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने त्यांना त्यांची बाजु मांडण्याची वाजवी संधी देण्यात येऊनही ते सुनावणी करिता अनुपस्थित आहेत. यावरुन त्यांना आयोगासमोरील सुनावणी मध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

याप्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये विस्तृत स्वरुपाची माहिती मागविलेली आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित/संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकारणा कडील मनुष्यबळ/साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल यामुळे असा माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही.

**आदेश**

अपिलार्थी यांची 07 द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

प्रकाश

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./२९१६ ते २९२०, ३३०७,३३०८ /२०२३ 7499 दि. 07/07/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
# माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ४९ | द्वितीय अपील क्रं. ३९६९/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. प्रकाश बाळाजीराव दळवे,<br>रा. मु. पो. वडेपुरी ता. लोहा जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल,<br>सामाजिक वनिकरण परिक्षेत्र लोहा जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनिकरण विभाग, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २२.६.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २१.२.२०२३ | दि. १५.१२.२०१५ पासुन ते आजपर्यंत या उद्यानात शासनाकडुन झालेला एकुण खर्च इ. |

आज रोजी सुनावणीच्यावेळी संबधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. १७.३.२०२३ रोजी प्रतिसाद देऊन माहितीचे अवलोकन करणे विषयी अपिलार्थी यांना कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक २७.४.२०२३ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. अपिलार्थी माहितीच्या अवलोकनसाठी कार्यालयात न आल्याने अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे शक्य झाले नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र-अ नुसार विस्तृत स्वरुपाची माहिती मागविली असल्याचे आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र लोहा जि. नांदेड यांना आदेशित करण्यात येते की, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणाऱ्या माहितीचे अवलोकन द्यावे. अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. विभागीय वनअधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग नांदेड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

सत्यमेव जयते
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./३९६९/२०२३ 7472 दि. ~~07/20~~ 07/07/2025

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

विभागीय वनअधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग नांदेड

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ५० ते ६० | द्वितीय अपील क्रं. ४८९८ ते ४९०८/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रणजित जळबाजी गवळे<br>रा. डॉ. आंबडेकर नगर ता. जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल सामाजिक वनिकरण परिक्षेत्र, हदगाव, मुदखेड, किनवट, भोकर, धर्माबाद, लोहा, बिलोली, नायगांव, कंधार, देगलूर, उमरी जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ११ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २५.२.२०२३,<br>१०.२.२०२३ | रोपवाटीकेचे अंदाजपत्रक मोजमाप पुस्तिका लेबर मस्टर व साहित्य खरेदी केलेल्या पावत्या कामाच्या प्रगती अहवालासह माहिती इत्यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती संबधित जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने विचाराधीन सर्व अपिले निकाली काढण्यात यावीत ही विनंती

आज रोजी सुनावणीच्यावेळी संबधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली असल्याने विचाराधीन अपील निकाली काढण्यात यावीत ही विनंती.

प्रस्तुत प्रकरणात आजरोजी आयोगासमोर झालेला युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने विचारधीन सर्व अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त ११ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४८९८ ते ४९०८/२०२३ 7473 दि. 07/07/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19(3) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-431001

| | |
|---|---|
| श्री. अशोक गोविंदराव जोंधळे<br>रा. एन डी-४२ जे- १ हडको बसस्टॉप हडको नवीन नांदेड | अपिलार्थी |

विरुध्द

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 61 | 4952 /2023 | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल ,<br>सामाजिक वनीकरण परिक्षेत्र हदगांव जि. नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 62 | 4953 /2023 | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल ,<br>सामाजिक वनीकरण परिक्षेत्र देगलूर जि. नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 63 | 4954 /2023 | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल ,<br>सामाजिक वनीकरण परिक्षेत्र नायगांव जि. नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 64 | 4955 /2023 | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल ,<br>सामाजिक वनीकरण परिक्षेत्र बिलोली जि. नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 65 | 4956 /2023 | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल ,<br>सामाजिक वनीकरण परिक्षेत्र मुदखेड जि. नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 66 | 4957 /2023 | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल ,<br>सामाजिक वनीकरण परिक्षेत्र धर्माबाद जि.नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 67 | 4958 /2023 | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल ,<br>सामाजिक वनीकरण परिक्षेत्र उमरी जि. नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 68 | 4959 /2023 | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल ,<br>सामाजिक वनीकरण परिक्षेत्र लोहा जि. नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 69 | 4960 /2023 | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल ,<br>सामाजिक वनीकरण परिक्षेत्र कंधार जि. नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 70 | 4961 /2023 | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल ,<br>सामाजिक वनीकरण परिक्षेत्र मुखेड जि. नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 71 | 4962 /2023 | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल ,<br>सामाजिक वनीकरण परिक्षेत्र भोकर जि. नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 72 | 4963 /2023 | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल ,<br>सामाजिक वनीकरण परिक्षेत्र किनवट जि. नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 73 | 4964 /2023 | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल , सामाजिक वनीकरण परिक्षेत्र नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

**( सुनावणी दिनांक 01.07.2025 )**

अपिलार्थी यांनी दिनांक ०७.८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी १३ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १५.२.२०२३, १३.२.२०२३ | लेखापरिक्षण अहवाल, सर्व योजनेचे कॅशबुक, बिल पासींग रजिस्टर, चेकबुकनोंदवही इत्यादी |

2. आज रोजी सुनावणीच्यावेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी विविध विषयाचे माहितीचे अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे सादर केलेले आहेत. मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने अर्जदारास सदर माहिती संकलित करुन द्यावयाची झाल्यास नियमित कामकाजावर त्याचा परिणाम होऊन नियमित कामे खोळंबून राहतात. अपिलार्थी माहितीचे अर्ज कार्यालयात करुन जन माहिती अधिकारी यांना त्रास देण्याच्या उद्देशाने माहितीची मागणी केलेली आहे. सदर अर्जावर कार्यवाही करताना कार्यालयाच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांची आयोगासमोरील सुनावणीसाठी ठेवण्यात आलेले सर्व विचाराधीन अपिले निकाली काढण्याची विनंती करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, ते स्वत: जन माहिती अधिकारी यांचे प्राप्त माहिती अधिकार अर्जाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी अधिकारी म्हणुन कामकाज करतात. अशा प्रकारे मोठया प्रमाणावर माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या

प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करावे लागतात त्यामुळे त्यांचा दैनंदिन प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत आहे. तसेच शासनाच्या शासकीय योजनाची अंमजबजावणी करणे शक्य होत नाही.

3. माहिती कायद्यामध्ये माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी माहितीचा मूळ उद्देश हा आहे की, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय कामात कार्य तत्परता असावी असा आहे. वारंवार माहिती अर्ज केल्याने शासकीय कामात अडथळा निर्माण होतो. तसेच शासकीय कामकाजावरही विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो.

एका व्यक्तीने मोठया संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज/ अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत/अपेक्षित नाही, यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठया प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालय/ प्राधिकरणास वेठीस धरत असुन त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालये/ प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे.

4. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील 6454/2011, दि. 09.08.2011 रोजी या प्रकरणी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी दिलेल्या निर्णयाकडे लक्ष वेधण्यात येत असुन या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने खालील आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where 75 % of the staff of public authorities spend 75 % of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

तसेच शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम

होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी /कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

5. यावरुन माहिती अधिकार कायद्यातंर्गत पुन्हा पुन्हा माहितीची मागणी केल्याने जन माहिती अधिकारी अपिलाशी संबंधित कर्मचारी, सार्वजनिक प्राधिकरण, प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यांचा मौल्यवान वेळ इतर शासकीय कामकाज करण्यासाठी देणे शक्य होत नाही. तसेच पुन्हा तोच विषय द्वितीय अपिलापर्यंत आल्यास माहिती आयोगाला क्रमवारीनुसार प्राप्त झालेल्या इतर द्वितीय अपिलांच्या सुनावणीसाठी वेळ देणे शक्य होत नाही.

उपरोक्त सर्व बाबी तसेच मा.सर्वोच्च न्यायालय निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे. म्हणुन आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

1. अपिलार्थी यांची सर्व 13 द्वितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.
2. विभागीय वनअधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांना असे निर्देशित करण्यात येते की, प्रस्तुत आदेशाची जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा नांदेड, यांचे मार्फत व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच सदर आदेश आपल्या अधिनिस्त कार्यालयातील सुचना फलकावर लावून आपल्या स्तरावरुन सुध्दा व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

प्र.इं.

**( प्रकाश इंदलकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जावक क्र./द्वि.अ.क्रं./2916 ते 2920, 3307, 3308 /2023 7497 दि. 07/08/2025

<u>प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता</u>

विभागीय वनअधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग नांदेड

राज्य माहिती आयोग

सत्यमेव जयते

खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ७४ | द्वितीय अपील क्रं. ६०५६/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अशोक पाटील कदम,<br>रा. मु. पो. मंगलसांगवी ता. कंधार जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी<br>सामाजिक वनिकरण विभाग, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनिकरण विभाग, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १८.९.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे:

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०५.७.२०२३ | चौकशी अहवाल अंतिम आदेश मिळणे बाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की,अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मोघमपणे विस्तृत स्वरुपाची माहिती मागविलेली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे याचा बोध होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने त्यांना त्यांची बाजु मांडण्याची वाजवी संधी देण्यात येऊनही ते सुनावणी करिता अनुपस्थित आहेत. यावरुन त्यांना आयोगासमोरील सुनावणीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

याप्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मोघम स्वरुपाची माहिती मागविलेली आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित/संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकारणा कडील मनुष्यबळ/साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६०५६/२०२३ 7479 दि. 07/07/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ७५ | द्वितीय अपील क्रं. ७७२८/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. भारत चंदर सुर्यवंशी<br>रा. लक्ष्मीनगर पो. तरोड ता. जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल,<br>सामाजिक वनिकरण परिक्षेत्र नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनिकरण विभाग, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.१२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ११.९.२०२३ | रस्त्याच्या दुतर्फे साइडने वृक्ष लागवड करण्यात आलेल्या कामाची व बजेटची संपुर्ण माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक ०९.११.२०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी

जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. विभागीय वनअधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग नांदेड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./७७२८/२०२३ 7475 दि. 07/07/2025

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

विभागीय वनअधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग नांदेड

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ७६ | द्वितीय अपील क्रं. ८२५८/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मो. रफिक मो. खाजामिया<br>रा. वाल्मीक नगर गरीब नवाज मस्जिद जवळ मुखेड जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल,<br>सामाजिक वनिकरण परिक्षेत्र मुखेड जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनिकरण विभाग, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २६.१२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे:

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १५.७.२०२३ | मुखेड तालुक्यात एकुण संख्या लागवडीचे ठिकाण वृक्षांची संगोपनाची कार्यपध्दती इत्यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकन करणे विषयी कळविण्यात आले होते. मात्र अपिलार्थी माहितीचे अवलोकन करण्यासाठी कार्यालयात न आल्याने अपिलार्थी यांना माहिती देणे शक्य झाले नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि. १८.९.२०२३ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने त्यांना त्यांची बाजु मांडण्याची वाजवी संधी देण्यात येऊनही ते सुनावणी करिता अनुपस्थित आहेत. यावरुन त्यांना आयोगासमोरील सुनावणीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र-अ नुसार मोघमपणे विस्तृत स्वरुपाची माहिती मागविली असल्याचे आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित/संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकारणा कडील मनुष्यबळ/साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र इं

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./८२५८/२०२३ 7476 दि. 07/07/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ७७ | द्वितीय अपील क्रं. १०८८/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | ॲड. जि. एस. रायबोळे<br>रा. किनवट जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.)<br>किनवट जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक<br>(जंकास व कॅम्पा) किनवट जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दिनांक ०६/२/२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ३१.१०.२०२२ | वृक्ष लागवड कामे जल व मृदसंधारण काम दगडी बांध उभारणे कामे |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि. २६.१२.२०२२ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मोघमपणे विस्तृत स्वरुपाची माहिती मागविलेली आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित/संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकारणा कडील मनुष्यबळ/साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही. याप्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाचा निर्णय पारित करताना अशा बाबी विचारात घेतल्या असल्याचे दिसुन येत नाही. सबब प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक २६.१२.२०२२ रोजी पारित केलेला निर्णय अधिक्रमित करुन आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१०८८/२०२३ 7477 दि. 07/07/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ७८ | द्वितीय अपील क्रं. १८५३/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गजानन विजय जिदेवार<br>रा. मु. पो. आष्टी ता. हदगांव जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.)<br>हदगांव जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक<br>( तेंदु व कॅम्पा) किनवट जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १३.३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०४.१०.२०२२ | किती वृक्ष लागवड करण्यात आली व कोणकोणत्या ठिकाणी करण्यात आली |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. ०१.११.२०२२ रोजी उत्तर देऊन माहितीचे अवलोकन करणे विषयी अपिलार्थी यांना कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी प्रथम अपिलावर दि. ३०.११.२०२२

रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे. सदर प्रकरणात अपिलार्थी माहितीचे अवलोकन करण्यास कार्यालयात न आल्याने अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे शक्य झाले नाही.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांना माहितीचे अवलोकन करणे विषयी सुचित केलेले आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकन करण्याची संधी उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र अपिलार्थी माहितीचे अवलोकन करण्यास कार्यालयात उपस्थित राहिलेले नाहीत. यावरुन अपिलार्थी यांना माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१८५३/२०२३ 7478 दि. 07/07/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19(3) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-431001

| | |
|---|---|
| श्री. प्रशांत रतन वाठोरे,<br>रा. गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड | अपिलार्थी |

विरुध्द

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 79, 80, 81, 82, | 1994, 1995, 1996, 1997, /2023 | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक , सामाजिक वनीकरण परिक्षेत्र हदगांव जि. नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, (जंकास व कॅम्पा) किनवट जि. नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 83 | 1998 /2023 | जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक , उप वनसंरक्षक वनविभाग जि. नांदेड यांचे कार्यालय | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, (रोहयो व वन्यजीव) नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 84 व 85 | 1999 व 2000 /2023 | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक, मुखेड जि. नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, (तेंदु व कॅम्पा) वनविभाग नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 86 व 87 | 2001 व 2002/ 2023 | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक, हिमायतनगर जि. नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, (तेंदु व कॅम्पा) वनविभाग नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 88 व 89 | 2003 व 2004 /2023 | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र हदगांव जि. नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, (तेंदु व कॅम्पा) वनविभाग नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

| बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | | |
|---|---|---|---|
| 90 व 91 | 2005 व 2006 /2023 | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र देगलूर जि.नांदेड | उत्तरवादी क्र. 1 |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, (तेंदु व कॅम्पा) वनविभाग नांदेड | उत्तरवादी क्र. 2 |

**( सुनावणी दिनांक 01.07.2025 )**

अपिलार्थी यांनी दिनांक २०.३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये १३ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.बहुतांश जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी १३ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| अपील क्रं. | माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|---|
| 1994/2023 | 29.11.2022 | विकास कामांच्या यादी सन 2020 ते 2022 |
| 1995/2023 | 05.12.2022 | मालकी पट्टयाची माहिती सन 2021 ते 2022 |
| 1996/2023 | 29.11.2022 | राजगड वन डेपो मध्ये करण्यात आलेल्या कामाची माहिती सन 2021ते2022 |
| 1997/2023 | 29.11.2022 | वन जमिनीची माहिती सन 2000 ते 2022 |
| 1998/2023 | 24.8.2022 | विकास कामांच्या यादीचा तपशील 2019 ते 2022 |
| 1999/2023 | 02.12.2022 | वन जमिनीची माहिती सन 2000 ते 2022 |
| 2000/2023 | 02.12.2022 | विकास कामांच्या यादीचा तपशील सन 2020 ते 2022 |
| 2001/2023 | 02.12.2022 | विकास कामांच्या यादीचा तपशील सन 2020 ते 2022 |
| 2002/2023 | 02.12.2022 | वन जमिनीची माहिती सन 2000 ते 2022 |
| 2003/2023 | 02.12.2022 | विकास कामांच्या यादीचा तपशील 2020 ते 2022 |
| 2004/2023 | 02.12.2022 | वन जमिनीची माहिती सन 2000 ते 2022 |
| 2005/2023 | 02.12.2022 | विकास कामांच्या यादीची माहिती सन 2020 ते 2022 |
| 2006/2023 | 02.12.2022 | वन जमिनीची माहिती सन 2000 ते 2022 |

2. आज रोजी सुनावणीच्यावेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी विविध विषयाचे माहितीचे अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे सादर केलेले आहेत. मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची व मोठया कालावधीची असल्याने अर्जदारास सदर माहिती संकलित करुन द्यावयाची झाल्यास प्रशासकीय कामकाजावर त्याचा परिणाम होऊन नियमित कामे खोळंबून राहतात.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

3. माहिती कायद्यामध्ये माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी माहितीचा मूळ उद्देश हा आहे की, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय कामात कार्य तत्परता असावी असा आहे. वारंवार माहिती अर्ज केल्याने शासकीय कामात अडथळा निर्माण होतो. तसेच शासकीय कामकाजावरही विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो.

एका व्यक्तीने मोठया संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज/ अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत/अपेक्षित नाही, यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठया प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालय/ प्राधिकरणास वेठीस धरत असुन त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालये/ प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे.

4. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील 6454/2011, दि. 09.08.2011 रोजी या प्रकरणी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी दिलेल्या निर्णयाकडे लक्ष वेधण्यात येत असुन या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने खालील आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where 75 % of the staff of public authorities spend 75 % of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

तसेच शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम

होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी /कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

5. यावरुन माहिती अधिकार कायद्यातंर्गत पुन्हा पुन्हा माहितीची मागणी केल्याने जन माहिती अधिकारी अपिलाशी संबंधित कर्मचारी, सार्वजनिक प्राधिकरण, प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यांचा मौल्यवान वेळ इतर शासकीय कामकाज करण्यासाठी देणे शक्य होत नाही. तसेच पुन्हा तोच विषय द्वितीय अपिलापर्यंत आल्यास माहिती आयोगाला क्रमवारीनुसार प्राप्त झालेल्या इतर द्वितीय अपिलांच्या सुनावणीसाठी वेळ देणे शक्य होत नाही.

उपरोक्त सर्व बाबी तसेच मा.सर्वोच्च न्यायालय निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही. मात्र प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करताना उपरोक्त बाबी विचारात घेतल्या असल्याचे दिसुन येत नाही. म्हणुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर पारित केलेले निर्णय अधिक्रमित करुन आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

1. अपिलार्थी यांची सर्व 13 द्वितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.
2. विभागीय वनअधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांना असे निर्देशित करण्यात येते की, प्रस्तुत आदेशाची जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा नांदेड, यांचे मार्फत व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच सदर आदेश आपल्या अधिनिस्त कार्यालयातील सुचना फलकावर लावून आपल्या स्तरावरुन सुध्दा व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./1994/2023 7572 दि. 09/07/2025

<u>प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता</u>

विभागीय वनअधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग नांदेड

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ९२ | द्वितीय अपील क्रं. १९८५/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विकास मारोती माहुरकर<br>रा. मु. पो. इस्लापूर ता. किनवट जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.)<br>इस्लापुर ता. किनवट जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,<br>(रोहयो व वन्यजीव) नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २०.३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी (प्रतिनिधी) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०२.११.२०२२ | सर्व नियतक्षेत्र मधील जंगलात झालेल्या कामाची माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना दिनांक ०५.३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये समक्ष उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्याने विचाराधीन अपील निकाली काढण्यात यावे ही विनंती.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१९८५/२०२३ 7502 दि. 07/07/2025

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

---

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ९३ | द्वितीय अपील क्रं. २०२९/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नागसेन किशनराव जोगदंड<br>रा. मु. पो. उमरा ता. लोहा जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.)<br>परिक्षेत्र मुखेड जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (तेंदु व कॅम्पा)<br>वनविभाग नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २३.३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०३.१०.२०२२ | आपल्या कार्यालयात असलेले अधिकारी कर्मचारी पदनिहाय व त्यांचे वनक्षेत्र असलेल्या गावांची यादी इत्यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २०.१०.२०२२ रोजी प्रतिसाद देऊन एक विषयाची माहिती मागणी करणे विषयी अपिलार्थी यांना कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि. ३०.११.२०२२

रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना एक विषयाच्या माहितीचे अवलोकन देणे बाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) परिक्षेत्र मुखेड जि. नांदेड यांना आदेशित करण्यात येते की, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणाऱ्या एक विषयाच्या माहितीचे अवलोकन द्यावे. अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. उपवनसंरक्षक वनविभाग नांदेड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./२०२९/२०२३ 7500 दि. 07/07/2025

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

उपवनसंरक्षक वनविभाग नांदेड

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ९४ ते ९७ | द्वितीय अपील क्रं. २४८६ ते २४८९/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. केशव रामा मुदेवाड<br>रा. विशालनगर वाडी, मौरचौक, निर्मला अपार्टमेंट नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक,<br>उप वनसंरक्षक वन विभाग, नांदेड यांचे कार्यालय | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक<br>(रोहयो व वन्यजीव), वनविभाग नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १७.४.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०४ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी ०४ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २७.१.२०२३ | * आपल्या कार्यालयाचे करण्यात आलेले लेखापरिक्षण च्या प्रती<br>* जिल्हा नियोजन समिती यांचेकडे दाखल केलेले उपयोगिता प्रमाणपत्र इत्यादी<br>* विविध मंजुर निधीतुन झालेल्या खर्चाचे दाखल केलेले उपयोगिता प्रमाणपत्र इत्यादी<br>* आपल्या कार्यालया अंतर्गत कार्यालयाचे लेखापरिक्षण सत्यप्रती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ३१.१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती व माहिती संदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना कळविली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी

दिनांक १६.३.२०२३ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.०५.४.२०२३ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त ०४ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./२४८६ ते २४८९/२०२३ 7501 दि. 07/07/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ९८ | द्वितीय अपील क्रं. ३५५९ /२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. आनंदा संतुका राजेमोड<br>रा. ब्राम्हणवाडा ता. जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक,<br>वन विभाग, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक<br>(रोहयो व वन्यजीव), वनविभाग नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ३१.५.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २२.११.२०२२ | बिटनिहाय व गटनिहाय रोख लेखा सादर केलेल्याची प्रत मिळणे बाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २५.११.२०२२ रोजी प्रतिसाद देऊन माहिती संदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना अवगत केली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि. २३.२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर झालेला युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना माहिती संदर्भातील वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपिलार्थी यांचे अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./३५५९ व ३५६०/२०२३ 7503 दि. 07/07/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ९९ | द्वितीय अपील क्रं. ३५६०/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. आनंदा संतुका राजेमोड<br>रा. ब्राम्हणवाडा ता. जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक,<br>वन विभाग, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (तेंदू व कॅम्पा),<br>वनविभाग नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दिनांक ३१.५.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये, द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २३.११.२०२२ | वन परिमंडळ निहाय कामाचे रोख लेखासह विविध योजना अंतर्गत कामाची मोजमाप पुस्तिका इत्यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मोघमपणे विस्तृत स्वरुपाची माहिती मागविली असल्याने माहितीचे अवलोकन करणे विषयी

अपिलार्थी यांना दिनांक ०६.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. मात्र अपिलार्थी माहितीचे अवलोकन करण्यास कार्यालयात आले नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती देणे शक्य झाले नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागविलेली असल्याने माहितीचे अवलोकन करण्याची संधी देऊनही अपिलार्थी माहितीचे अवलोकन करण्यास आले नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान आयोगास अवगत केले आहे. याप्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मोघम स्वरुपाची विस्तृत माहिती मागविलेली आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित/संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकारणा कडील मनुष्यबळ/साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./३५६०/२०२३ 7504 दि. 07/07/2026

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. १०० | द्वितीय अपील क्रं. ४४३७/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. काशीनाथ नारायण शिंदे<br>रा. मु. पो. इस्लापूर ता. किनवट जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक<br>इस्लापूर ता. किनवट जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक<br>(रोहयो व वन्यजीव), वनविभाग नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दिनांक ०५.७.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २०.४.२०२३ | सर्व योजनानिहाय प्राप्त अनुदानाचे रोखलेखानुसार ३२ नंबरचे व्हॉचर मिळणे बाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहितीचे अवलोकन करणे विषयी अपिलार्थी यांना कळविलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि. १३.६.२०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात आजरोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी त्यांना माहिती प्राप्त झालेली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे. प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागविलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक इस्लापूर जि. नांदेड यांना आदेशित करण्यात येते की, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणाऱ्या माहितीचे अवलोकन द्यावे.अवलोकनांती,अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. उपवनसंरक्षक वनविभाग नांदेड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४४३७/२०२३ 7505 दि. 07/07/2025

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

उपवनसंरक्षक वनविभाग नांदेड

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. १०१ व १०२ | द्वितीय अपील क्रं. ६१२९ व ६१३०/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | कुणाल सुरेशराव पिंपळे रा. कावळे गल्ली ह. मु. नारळा पैठण ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २२.९.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी ,अपिलार्थी यांचे प्रतिनिधी ॲड मयुर बाहेगव्हाणकर व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २१.६.२०२३ | दिनांक २४.३.२०२३ रोजीच्या निवेदन/तक्रार अर्जावर दैनंदिन पत्रव्यवहार इत्यादी |
| २१.६.२०२३ | दिनांक ४.१.२०२३ रोजीच्या निवेदन अर्जावर दैनंदिन पत्रव्यवहार इत्यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८.७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहितीचे शुल्क भरणे बाबत सुचित केलेले आहे. मात्र सदर पत्र ३० दिवसाच्या मुदतीनंतर प्राप्त झाले आहे. त्यामुळे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनाशुल्क देणे आवश्यक आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील सुनावणीत सदर बाब विचारात न

घेताच प्रथम अपील फेटाळले आहेत. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहितीचे शुल्क भरणा करणे विषयी अपिलार्थी यांना दिनांक १८.७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. मात्र अपिलार्थी यांनी माहितीचे शुल्क भरणा न करता प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५.९.२०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील फेटाळले आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगा समोर झालेला युक्तीवाद व आयोगासमोर उपलब्ध असलेल्या अभिलेखावरुन दिसुन येते की,जन माहिती अधिकारी यांनी माहितीचे शुल्क भरणा करणे विषयी अपिलार्थी यांना दिनांक १८.७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. मात्र सदरील पत्र विहीत मुदतीनंतर प्राप्त झाले असल्याचे अपिलार्थी यांनी सुनावणीवेळी आयोगास अवगत केले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

४. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

५. उपसंचालक, भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

६. उपरोक्त निर्देशासह ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६१२९ व ६१३०/२०२३ 7506 दि. 07/07/2025

<u>प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता</u>

उपसंचालक, भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर